|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office जनसंपर्क विभाग

**बातमी क्र. १**

जळगाव १२ ( ) 'स्वच्छ भारत - उन्हाळी प्रशिक्षण : १०० तास स्वच्छतेसाठी' या अभिनव उपक्रमामध्ये उमवि परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांची नोंदणी करण्याचे उद्दीष्ट पुर्ण करण्यासाठीचा निर्धार तिनही जिल्ह्यात अधिसभा सदस्यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

मानव संसाधन विकास मंत्रालय तसेच पाणी व स्वच्छता मंत्रालय यांच्या सहयोगाने स्वच्छता उपक्रम सामुहिक चळवळ होण्याच्या उद्देशाने 'स्वच्छ भारत - उन्हाळी प्रशिक्षण : १०० तास स्वच्छतेसाठी' या उपक्रमाची घोषणा करण्यात आली आहे. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परिक्षेत्रात या उपक्रमात तरूणांचा अधिक सहभाग वाढावा यासाठी जळगाव, धुळे व नंदुरबार या तिनही जिल्ह्यात त्या-त्या जिल्ह्यातील अधिसभा सदस्यांसमवेत आज मंगळवार दिनांक १२ जून रोजी जिल्हानिहाय बैठक आयोजित करण्यात आल्या होत्या. विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र प्रशाळेत जळगाव जिल्ह्यासाठी झालेल्या बैठकीप्रसंगी जिल्ह्यातील अधिसभा सदस्य, प्राचार्य, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यकम अधिकारी, विद्यार्थी विकास अधिकारी व एन.सी.सीचे कमांडींग अधिकारी उपस्थित होते. या बैठकीस व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, प्रा.नितीन बारी, प्रभारी विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.एस.टी.इंगळे उपस्थित होते.

ऑनलाईन नोंदणीसाठी येणाऱ्या अडचणींवर मात करून कार्य करावयाचे आहे यासाठी महाविद्यालयांमध्ये जाऊन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यासाठी प्रयत्न करावयाचे आहेत असे यावेळी दिलीप पाटील म्हणाले. या उपक्रमातून ग्रामीण भागात जनजागृती व्हावी आणि स्वच्छतेसाठी लोकांचा सहभाग वाढावा या उद्देशाने पथनाट्य, रॅली, घनकचरा व्यवस्थापन असे अनेक उपक्रमाबाबत प्रा.मनोज पाटील व प्रा.दीपक सोनवणे यांनी सादरीकरणाद्वारे मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्रा.एस.टी.इंगळे यांनी केले. बैठकीचे सुत्रसंचालन प्रा.पंकजकुमार नन्नवरे यांनी केले तर आभार प्रा.दीपक सोनवणे यांनी मानले.

धुळे येथे झालेल्या बैठकीत व्यवस्थापन परिषद सदस्य दीपक पाटील यांनी मार्गदर्शन केले यावेळी मोहन पावरा, प्राचार्य पी.पी.छाजेड उपस्थित होते प्रास्ताविक प्रा.आर.के.जाधव तर प्रा.विलास चव्हाण यांनी सादरीकरणाद्वारे उपक्रमाची माहिती दिली. अधिसभा सदस्य राजेंद्र जाखडी यांनी औद्योगिक संस्थांच्या मदतीने रॅली, पथनाट्य आयोजित करण्याविषयी सूचना केली. बैठकीस धुळे जिल्ह्यातील अधिसभा सदस्य, ३९ राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यकम अधिकारी, विद्यार्थी विकास अधिकारी उपस्थित होते. नंदुरबार येथे झालेल्या बैठकीस व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ.डी.एस.सुर्यवंशी यांनी मार्गदर्शन केले यावेळी महाविद्यालयांनी केलेल्या नोंदणीचा आढावा घेण्यात आला. याप्रसंगी आमदार उदयसिंग पाडवी, अधिसभा सदस्य लता मोरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व सादरीकरण डॉ.राम पेटारे यांनी केले. ३० पेक्षा अधिक कार्यकम अधिकारी, विद्यार्थी विकास अधिकारी उपस्थित होते.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि.१२ ( ) :- उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षातंर्गत वेबदुनिया डॉट कॉम या नामांकीत कंपनीतर्फे खुल्या परीसर मुलाखतीचे आयोजन करण्यात येणार आहे.

पदवीधर व पदव्युत्तर असणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता या परिसर मुलाखतीचे आयोजन करण्यात येत आहे. यासंदर्भात अधिक माहितीसाठी www.nmu.ac.in/tpcell/en-us/tpchome.aspx या संकेतस्थळावर इच्छुक व पात्रताधारक विद्यार्थ्यांनी ५ जुलैपर्यंत नाव नोंदणी करावी असे आवाहन या कक्षामार्फत करण्यात आले आहे.

---

जा.क्र . : उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दिनांक : १२ जून, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,